दूरध्वनी क्रमांक : २२०९१८०३/
२२०४२८६६

क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. १७८
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक - १७/०३/२०१५.

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये
२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे मासिक उर्वरीत नियतन माहे एप्रिल, २०१५.

संदर्भ :- १. क्र.असुका-२०१५/प्र.क्र. ३१/नापु. २२ दि. २५ फेब्रुवारी,२०१५.
२. क्र. निशि/मागणी/२०१५/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. १३६ दि. २६.०२.२०१५.

शासनपत्र क्र.असुका २०१५/प्र.क्र. ३१/नापु.२२ दि. २५ फेब्रुवारी, २०१५ अन्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे एप्रिल, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील ८८०७६३७ लाभार्थी सदस्य संख्येसाठी १७६१५ मे. टन तांदूळ व २६४२३ मे. टन गहू असे एकूण ४४०३८ मे.टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात माहे जानेवारी, २०१५ अखेरची प्राधान्य कुटुंब योजनेची लोकसंख्या ही ८८६७९८७ अशी आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१५ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (तांदूळ २ किलो व गहू ३ किलो) असे आहे.

यापूर्वी प्राप्त शासन पत्र क्र.असुका/२०१४/प्रक्र.१०६/ना.पु.२२, दि. १ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्राप्त सुचनेनुसार प्रत्येक महिन्याची उचल ही त्या पूर्वीच्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश प्राप्त झाल्याने व मागील एक महिन्यापूर्वीच्या अखेरच्या शिलकीमध्ये चालू महिन्यासाठी प्राप्त झालेले धान्य समाविष्ट असल्याने अधिकृत शिधावाटप दुकानाची १००% आवश्यकता विचारात घेऊन नियतन आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर कार्यवाही संबंधीत अ.शि.दुकानदार व धान्य उचल करणा-या संघटीत संस्थांना नियतन आदेश त्वरीत प्राप्त होण्याचे दृष्टीने करण्यात आली होती जेणेकरून उपरोल्लेखित प्राप्त सूचनांनुसार अलिकडच्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत उचल पूर्ण होऊ शकेल. सदर १००%नियतनाचे आदेश हे माहे नोव्हेंबर २०१४ ते फेब्रुवारी २०१५ पर्यंत निर्गमित करण्यात आले आहेत. प्रकरणी अधिकृत शिधावाटप दुकानांकडे काही प्रमाणात साठा दरमहा शिल्लक रहात असल्याचे निदर्शनास आल्याने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये प्राप्त होणारे धान्य, विक्री ,सुरुवातीची शिल्लक याबाबतची माहिती ज्या विहीत नमुन्याव्दारे प्रधान कार्यालयास प्राप्त होते त्या विहीत नमुन्यात सुधारणा या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/मागणी/२०१५/जा.क्र.२२ दि.०९.०१.१५ अन्वये करण्यात आली. जेणे करून मागिल महिन्यापर्यंतची अखेरची शिल्लक व चालू महिन्यापोटी मागील महिन्यात प्राप्त झालेल्या धान्याची अखेरची शिल्लक अशी पृथक आकडेवारी प्राप्त झाली व त्यानुसार अधिकृत शिधावाटप दुकानातून माहे

फेब्रुवारी, २०१५ अखेर (माहे मार्च, २०१५ करीता प्राप्त झालेला धान्यसाठा वगळता) खालीलप्रमाणे धान्य साठा शिल्लक असल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | परि मंडळ | एकूण प्राधान्य कुटूंब | | अ.शि.वा. दुकाननिहाय शिल्लक साठा (मे. टन) | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | | | |
| | | शिधापत्रिका | लोकसख्या | तांदूळ | गहू |
| १ | अ | २२३६९३ | ९८१०३९ | ३८८.४३६ | ४६५.२०२ |
| २ | ड | २४७४५४ | ११०२१०३ | ३६८.०९६ | ४६७.५९८ |
| ३ | ई | ५३६९९४ | २५११७२३ | ५४०.२७५ | ७२८.८५७ |
| ४ | ग | २६९१८२ | ११९७९३९ | ५४३.३५१ | ६४७.३२५ |
| ५ | फ | ६९४८४४ | ३०७४४८५ | ७५२.०७९ | ८७१.७६१ |
| एकूण | | १९७२१६७ | ८८६७२८७ | २५९०.२३७ | ३१८०.५४३ |

संदर्भाधीन पत्र क्र.२ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या ५०% नियतनाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

(आकडे मे.टन मध्ये)

| अ. क्र | परि मंडळ | एकूण | | मंजूर नियतन (एकूण आवश्यकतेच्या ५०%) | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ (प्रति व्यक्ति २ किलो) | गहू (प्रति व्यक्ति ३ किलो) |
| १ | अ | २२३६९३ | ९८१०३९ | ९८१.०३९ | १४७१.७१४ |
| २ | ड | २४७४५४ | ११०२१०३ | ११०२.१०३ | १६५३.२७९ |
| ३ | ई | ५३६९९४ | २५११७२३ | २५११.७२३ | ३७६७.८३८ |
| ४ | ग | २६९१८२ | ११९७९३९ | ११९७.९३९ | १७९७.०६९ |
| ५ | फ | ६९४८४४ | ३०७४४८५ | ३०७४.४८५ | ४६३२.०७५ |
| एकूण | | १९७२१६७ | ८८६७२८७ | ८८६७.२८७ | १३३०१.९७५ |

तसेच अधिकृत शिधावाटप दुकानातील शिल्लक साठा विचारात घेऊन अधिकृत शिधावाटप दुकानांना मंजूर करावयाची आकडेवारी ही पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे. सदर आकडेवारीत अधिकृत शिधावाटप दुकानांच्या एकुण आवश्यकतेच्या उर्वरीत ५०% आवश्यकतेमधून शिल्लक साठा वजा जाता अधिकृत शिधावाटप दुकानांना प्रत्यक्षात मंजूर केलेल्या नियतनाच्या आकडेवारीची बेरीज नमूद करण्यात आली आहे.

परंतू प्रत्यक्षात काही अधिकृत शिधावाटप दुकानातून शिल्लक असलेला धान्य साठा हा त्यांच्या माहे एप्रिल,२०१५च्या उर्वरीत ५०% आवश्यकतेपेक्षा जास्त असून त्याची अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय माहिती मंजूर नियतनाचे तक्त्यात सोबत जोडण्यात येत आहे. अधिकृत शिधावाटप दुकानांकडे शिल्लक साठ्यापैकी उर्वरित नियतनापोटी ५०% साठा वापरून त्यापेक्षा जास्त असलेला साठा हा माहे मे, २०१५

ने नियतन म्हणून शिल्लक ठेवावयाचा आहे व त्याचे समायोजन माहे मे, २०१५ करीता प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याची परिमंडळ निहाय माहीती पुढीलप्रमाणे आहे.

परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त असलेला एकूण शिल्लक साठा

(आकडे मे.टन मध्ये)

| अ.क्र. | परिमंडल | एकूण पाधान्य कुटूंब | | परीमंडळ निहाय १००% पेक्षा जास्त असलेला एकूण शिल्लक साठा (आकडे मे.टन मध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | | | |
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू |
| १ | अ | २२२६१३३ | ९८१०३९ | ५७.६६० | ४३.०४८ |
| २ | ड | २४७४५४ | ११०२१०३ | २५.६७४ | २५.५३४ |
| ३ | ई | ५३६९९४ | २५११७२१ | ४५.२३९ | ६३.४०७ |
| ४ | ग | २६११८२ | ११९७९३९ | १००.२२१ | १०८.५४५ |
| ५ | फ | ६९४८४४ | ३०७४४८५ | १२४.९९६ | १३७.७५९ |
| एकुण | | १९७२१६७ | ८८६७२८७ | ३५३.५९ | ३७६.२९३ |

सर्व अधिकृत शिधावाटप दुकानांना ५०% नियतन दिनांक २६.२.२०१५ चे पत्रान्वये मंजूर करण्यात आले असून सदर मंजूर नियतन व दूकानातील फेब्रुवारी, २०१५ अखेरचा प्रत्यक्ष शिल्लक साठा मिळून १००% गरज पूर्ण होत असल्याने सदर दुकानांना १००%पेक्षा जास्त नियतन देता येत नाही. अशा दुकानदारांनी शिल्लक साठयातून उर्वरीत ५०% नियतनाचे वाटप शिधापत्रिकाधारकांना करावे व १०० % आवश्यकतेपेक्षा जास्त धान्यसाठा जो नियतनाचे शेवटच्या रकान्यात दर्शविण्यात आला आहे, तो माहे मे, २०१५ चा कोटा म्हणून शिल्लक ठेवण्यात यावा, तशा स्वयंस्पष्ट सूचना अधिकृत शिधावाटप दुकानदारांना देण्यात याव्यात.

उपरोल्लेखित शिल्लक साठा हा यापूर्वीच अधिकृत शिधावाटप दुकानात उपलब्ध असून प्रत्यक्षात त्या दुकानांची १००% आवश्यकता पूर्ण झाल्याने त्या दुकानांचे समोर मंजूर नियतनात ०.०० (निरंक) अशी आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. सदर नियतन हे व्यक्तीनिहाय व दुकाननिहाय मंजुर करण्यात येत असल्याने वजा (उदा.-३५,-४५ वगैरे) आकडेवारी दुकाननिहाय नियतनात दर्शविल्यास त्या शिधावाटप कार्यालयाने एकूण मंजूर नियतन प्रत्यक्ष गरजेपेक्षा कमी होत असून अन्य शिधापत्रिकाधारक वंचित राहू नयेत म्हणून सदर अतिरिक्त साठा हा स्वतंत्र रकान्यात दर्शविण्यात येत आहे. माहे एप्रिल, २०१५ करीता ज्या अधिकृत शिधावाटप दुकानांना धान्य साठा मंजूर करण्यात आला आहे त्या दुकानांची परिमंडळनिहाय एकूण मंजूर नियतनाची आकडेवारी ही पुढील प्रमाणे आहे.

(आकडे मे.टन.)

| परी मंडळ | दि.२६.०२.२०१५ चे पत्रान्वये ५०% मंजूर नियतन- | | प्रत्यक्ष अ.शि.दुकानातील माहे फेब्रुवारी,२०१५ अखेरचा शिल्लक साठा विचारात घेऊन मंजूर करण्यात आलेले उर्वरित नियतन | | माहे एप्रिल, २०१५ करीता एकूण मंजूर नियतन. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| अ | ९८१.०३९ | १५७१.७१४ | ६५०.२८३ | १०४९.२४९ | १६३१.३२२ | २५२०.९६३ |
| ड | ११०२.१०३ | १६५३.२७९ | ७५९.४८१ | १२१०.९६६ | १८६१.५८४ | २८६४.२४५ |
| ई | २३३३.७२१ | ३७६७.८३८ | २०१६.६८५ | ३०९९.८७५ | ४५२८.४०६ | ६८६७.७१३ |
| ग | ११३७.१३९ | १७३७.०६९ | ७१६.८०९ | १२५८.१६८ | १९५४.७४८ | ३०५५.२३७ |
| फ | ३०७४.४८५ | ४६१२.०७५ | २४४७.४०२ | ३८७७.३७८ | ५५२१.८८७ | ८४८९.४५३ |
| एकूण | ८८६७.२८७ | १३३०१.९७५ | ६६३०.६६ | १०४९५.६३६ | १५४९७.९४७ | २३७९७.६११ |

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे एप्रिल, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी वितरण आदेश त्वरीत प्राप्त करून घेण्याच्या सूचना संघटीत संस्थांना द्याव्यात. तथापि १००% वितरण आदेश दिनांक ३०.०३.२०१५ पर्यंत प्राप्त करून घ्यावेत. संलग्न संस्थांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.०३.२०१५ पर्यंत १००% पूर्ण करावी.

गोदामातून उचल केलेले अन्नधान्य विहित मुदतीत सर्व संबंधित शिधापत्रिकाधारकांना पोहोचेल याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी खबरदारी घ्यावी व त्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करून उक्त परिपत्रकांतील आदेशाची अंमलबजावणी करावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा संघटित संस्थांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच आय. डी. टी. बाबत पत्र दिनांक ०५/०१/२०१० मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहीक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/उ) यांना पाठवावा.

Shrinivas Sangle

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंच आणि साबांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका( संबंधीत परिमंडळ मार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ वी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, ,.आर.एच.४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
१५. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, मुं. १४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या..कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई.
३. उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) परेल, मुंबई.
४. उप संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुं-२१
५. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप, (दक्षता शाखा).
६. सर्व संघटित संस्था, परिमंडळ कार्यालयामार्फत.
७. कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रशासन शाखा व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.